**कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना**

**टोल फ्री क्रमांक - 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 23.09.2020.**

**तहसिल कार्यालय, जालना येथील खासगी ऑपरेटर श्री. पवन दत्तात्रय राऊत यास 2,400/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री. पवन दत्तात्रय राऊत वय 23 वर्ष व्यवसाय खासगी ऑपरेटर रा. राज रेसिडेन्सी रो हाऊस नं 5 यशवंतनगर अंबड रोड जालना मुळ रा साळगाव ता परतुर जि जालना ( खाजगी ऑपरेटर ) |
| 2 | गुन्हा घडलां तारीख व ठिकाण | :- | दि- 23.09.2020 रोजी तहसिल कार्यालय जवळील गेटजवळ जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 2,400/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांना संजय गांधी निरीधार योजनेचे अनुदानाची रक्कम 12,400/- रुपये मंजुर झालेली असुन सदर मंजुर अनुदान रक्कम त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी तहसिल कार्यालय जालना येथील खासगी ऑपरेटर श्री पवन दत्तात्रय राऊत यांनी तुमच्या खात्यावर संजय गांधी निराधार योजनेचे पैसे जमा करुन टाकायचे असेल तर मला 2,400/- रुपये दयावे लागतील तुम्ही मला पैसे दिले नाही तर तुमच्या खात्यावर पैसे जमा होणार नाही, असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे 2,400/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दि. 10.09.2020 रोजी पडताळणी केली असता खासगी ऑपरेटर श्री पवन दत्तात्रय राऊत यांनी तक्रारदार यांचेकडे 2,400/- रुपयेची लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले होते, तसेच आज दि. 23.09.2020 रोजी खासगी ऑपरेटर श्री पवन दत्तात्रय राऊत यांनी तक्रारदार यांचे संजय गांधी निराधार योजनेचे मंजुर अनुदान त्यांचे बँकेचे खात्यावर जमा करुन देण्यासाठी त्यांचेकडुन 2,400/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने तहसिल कार्यालय जालना येथे रंगेहाथ पकडले आहे.

खाजगी ऑपरेटरश्री. पवन दत्तात्रय राऊत वय 23 वर्ष व्यवसाय खासगी ऑपरेटर रा. राज रेसिडेन्सी रो हाऊस नं 5 यशवंतनगर अंबड रोड जालना मुळ रा साळगाव ता परतुर जि जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही प्रभारी पोलीस अधिक्षक डॉ. अनिता जमादार, ला.प्र.विभाग औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री. रविंद्र डी.निकाळजे तसेच कर्मचारी श्री. ज्ञानदेव झुंबड, श्री. मनोहर खंडागळे, श्री. अनिल सानप, श्री. आत्माराम डोईफोडे, श्री. ज्ञानेश्वर म्हस्के, श्री. शिवाजी जमधडे, श्री. सचीन राऊत, श्री. जावेद शेख, चालक श्री. आरेफ शेख यांनी पार पाडली.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
ला प्र वि, जालना.